MHKO180004262023

**नियमीत दिवाणी दावा क्र.१३१/२०२३ मधील**
**निशाणी क्र.२० खालील आदेश.**
**[अमोल देवगोंडा पाटील वि. देवगोंडा बाळगोंडा पाटील आणि इतर.]**

वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचा आदेश VI नियम १७ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. वादी यांच्या विद्यमान वकीलांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असे नमूद केले आहे की, दावा मिळकतींच्या वाटपाकरीता प्रस्तुतचा दावा दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत दाव्यातील परिच्छेद क्र.१(ब) मध्ये दावा मिळकतीचा ग्रामपंचायत मिळकत क्रमांक नमूद करण्यात आला आहे. सन–१९९० साली मौजे हेरवाड येथील मिळकतींचा सिटी सर्व्हे झाला असून त्या अनुषंगाने दाव्यातील परिच्छेद क्र.१(ब) मधील दावा मिळकतीचा सिटी सर्व्हे क्रमांक व चतु:सिमा दाव्यामध्ये नमूद करणे वादी यांच्याकडून अनावधानाने व नजरचुकीने राहून गेल्यामुळे त्याबाबत दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करण्याकरीता वादी यांना प्रस्तुत अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. प्रस्तुत अर्जातील परिच्छेद क्र.१ मध्ये नमुद करण्यात आलेली दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, सदर दुरुस्ती न केल्यास वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात यावा, अशी विनंती वादी यांच्या विद्यमान वकीलांनी केली आहे.

०३. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

०४. दावा, कैफियत, प्रस्तुत अर्ज व प्रतिवादींनी दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन करण्यात आले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत दावा दाखल करीत असतेवेळी दाव्यातील परिच्छेद क्र.१(ब) मधील दावा मिळकतीचा सिटी सर्व्हे क्रमांक व चतु:सिमा दाव्यामध्ये नमूद करणे वादी यांकडून अनावधानाने व नजरचुकीने राहून गेल्यामुळे सदरची बाब दाव्यामध्ये नमूद करण्याकरीता वादी यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्याचा गुणवत्तेवर निकाल लावण्याकरीता आवश्यक असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत आहे. तसेच, वादी यांना प्रस्तुत अर्जामधील प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे व दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर करणे न्यायोचित होईल. वादी यांनी प्रस्तुतचा दावा दिनांक १९.०६.२०२३ रोजी दाखल केला असून प्रस्तुतचा अर्ज दिनांक

११.०८.२०२५ रोजी दाखल केल्याचे दिसून येत आहे. वादी यांना प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब विचारात घेता, प्रस्तुतचा अर्ज पाचशे रुपये इतक्या खर्चासह मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :–

**:: आदेश ::**

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रुपये ५००/– (अक्षरी रक्कम रुपये पाचशे फक्त) इतक्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी पुढील तारखेपर्यंत दाव्यामध्ये प्रस्तुत अर्जातील नमुद दुरुस्ती करुन दाव्याची दुरुस्ती प्रत प्रस्तुत प्रकरणामध्ये दाखल करावी. तसेच, दुरुस्त दाव्याची प्रत्येकी एक प्रत प्रतिवादींना द्यावी.

३. वादी यांनी खर्चाची रक्कम रुपये ५००/– (अक्षरी रक्कम रुपये पाचशे फक्त) प्रतिवादींना द्यावी.

४. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(प्रस्तुतचा आदेश खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2025.08.12 17:54:54 +0530

दिनांक : ११.०८.२०२५ (बाळासाहेब श्री. गायकवाड)
कुरुंदवाड. दिवाणी न्यायाधीश क. स्तर ,
कुरुंदवाड.